RNI No. MAHBIL /2009/35530

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ३, अंक ३३(४)] गुरुवार, जून २९, २०१७/आषाढ ८, शके १९३९ [पृष्ठे २, किंमत : रुपये २३.००

### असाधारण क्रमांक ६४

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे कार्यालय**

राजभवन, मलबार हिल, मुंबई ४०० ०३५, दिनांक १४ जून २०१६

**उद्देशिका**

**भारताचे संविधान.**

क्रमांक आरबी/डीबी/ई-११०१९(८९)(२०१३)/८५०/२०१६.—**ज्याअर्थी,** भारताच्या संविधानाच्या पाचव्या अनुसूचीच्या परिच्छेद ५ च्या उप परिच्छेद (१)अन्वये, राज्यपालांना, जाहीर अधिसूचनेद्वारे, असा निदेश देता येईल की, संसदेचा किंवा राज्याच्या विधानमंडळाचा एखादा विशिष्ट अधिनियम, त्या राज्यातील एखाद्या अनुसूचित क्षेत्राला किंवा त्याच्या एखाद्या भागाला लागू असणार नाही, अथवा त्या अधिसूचनेतील विनिर्दिष्ट अपवादांच्या व फेरबदलांच्या अधीन राहून, त्या राज्यांतील एखाद्या अनुसूचित क्षेत्राला किंवा त्याच्या एखाद्या भागाला लागू असेल ;

**आणि ज्याअर्थी,** आर्थिक बळजबरी, लबाडी किंवा बनावट दस्तऐवज तयार करुन, अनुसूचित क्षेत्रातील आदिवासींच्या जमिनीचे अन्यसंक्रामण होत नाही याची सुनिश्चिती करण्याच्या विविध उपाययोजना हाती घेणे आवश्यक आहे ;

**आणि ज्याअर्थी,** पंचायतीसंबंधीचे उपबंध (अनुसूचित क्षेत्रांवर विस्तारीत करणे) अधिनियम, १९९६ (यात यापुढे ज्याचा उल्लेख पेसा असा करण्यात आला आहे) हा, उक्त अधिनियमान्वये हमी दिलेल्या विविध हक्कांविषयी निर्णय घेताना ग्रामसभेच्या मध्यस्थतेस मान्यता देतो ;

**आणि ज्याअर्थी,** पेसाचे कलम ४ (ड) (तीन) " अनुसूचित क्षेत्रातील जमिनीच्या अन्यसंक्रामणास प्रतिबंध करण्याचा आणि अनुसूचित जनजातीच्या अवैधरित्या अन्यसंक्रामित झालेल्या कोणत्याही जमिनीच्या पुनःस्थापनासाठी कृती करण्याचा अधिकार ग्रामसभेस देते ";

**आणि ज्याअर्थी,** पंचायतीसंबंधीचे उपबंध (अनुसूचित क्षेत्रांवर विस्तारीत करणे) अधिनियम, १९९६ च्या कलम ४ (ड) (तीन) याला राज्याचे महसूल कायदे मिळतेजुळते करणे इष्ट आहे;

**आणि ज्याअर्थी,** वरील प्रयोजने साध्य करण्यासाठी महाराष्ट्र महसूल संहिता, १९६६ यामध्ये सुधारणा करणे इष्ट आहे;

**त्याअर्थी,** पुढील अधिसूचना, ती **राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येईल :–

## अधिसूचना

**भारताचे संविधान.**

भारताच्या संविधानाच्या पाचव्या अनुसूचीच्या परिच्छेद ५ च्या उप परिच्छेद (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम ३६ क, महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित क्षेत्रांना लागू करताना, ते पुढील फेरफारांसह लागू करण्यात येईल, असा निदेश देत आहेत :—

"(एक) कलम ३६ क च्या पोट-कलम (१) मधील पहिल्या परंतुकानंतर पुढील परंतुक समाविष्ट करण्यात येईल :—

परंतु आणखी असे की, महाराष्ट्र राज्याच्या अनुसूचित क्षेत्रातील गावांमध्ये ज्या ग्रामसभेच्या अधिकारक्षेत्राखाली अनुसूचित जनजातितील हस्तांतरक निवास करीत असेल त्या ग्रामसभेची पूर्वमंजुरी घेतली नसेल तर अनुसूचित जनजातीच्या व्यक्तीकडून बिगर आदिवासी व्यक्तीकडे वहिवाटीच्या हस्तांतरणास परवानगी देणारी अशी कोणतीही मंजुरी जिल्हाधिकाऱ्यांकडून देण्यात येणार नाही ";

(दोन) पोट-कलम (४) मध्ये, " अशा वहिवाटीमध्ये हितसंबंध असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने " या मजकुरानंतर, " किंवा अनुसूचित क्षेत्रातील ग्रामसभेच्या ठरावावरून " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

**चे. विद्यासागर राव,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**बी. वेणुगोपाल रेड्डी,**
राज्यपाल यांचे सचिव.

राजभवन, मलबार हिल,
मुंबई ४०० ०३५,
दिनांक १४ जून २०१६.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.